मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 19 जून 2024 | पान- 1

# कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी उरले फक्त 10 दिवस!

## कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी 30 जूनपर्यंत मुदत : जास्तीत जास्त मालमत्ता धारकांनी लाभ घेण्याचे महापालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी 30 जूनपर्यंत मुदत आहे. त्यामुळे शेवटचे फक्त 10 दिवस बाकी असून कॅश काऊंटर उद्या (दि.18) जूनपासून सकाळी पावणेदहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. कर सवलतींचा जास्तीत-जास्त मालमत्ता धारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने सिध्दी उपक्रमा अंतर्गत महिला बचत गटामार्फत मालमत्ता धारकांना बिलांचे वेळेत वाटप करण्यात आले आहे. त्यामुळेच 2024-25 या आर्थिक वर्षातील अडीच महिन्यांत 3 लाख 9 हजार 233 मालमत्ता धारकांनी 362 कोटी 12 लाख रुपयांचा महसूल महापालिका तिजोरीत जमा केल्याची माहिती कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.

कर संकलन विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांना विविध कर सवलती देण्यात येत असून या सवलतींची 30 जून मुदत आहे. त्यामुळे आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत कर भरण्याकडे मालमत्ता धारकांचा कल असतो. महापालिकेच्या वतीने कर संकलनासाठी 17 झोन आहेत. तसेच ऑनलाईनही सुविधा उपलब्ध आहे. मात्र, अनेक नागरिक रोखीने कर भरत आहेत. त्यामुळे कर संकलन कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून नागरिकांची मोठी गर्दीही होत आहे. महापालिकेने सकाळी पावणेदहा ते सायंकाळी 6 या वेळेत कॅश काऊंटर सुरू ठेवण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. तसेच कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी 30 जूनपर्यंत जास्तीत-जास्त मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा करावा, असे आवाहन सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.

**अडीच महिन्यातच पन्नास टक्के मालमत्ता धारकांनी भरला कर..**

» शहरातील मालमत्ता धारकांनी वेळेवर कर भरावा, यासाठी महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. कर थकीत ठेवल्यास त्यावर दंडाची रक्कम वाढतच जाते, त्यामुळे वेळेत कर भरणे कधीही मालमत्ता धारकांच्या हिताचेच असल्याचे पटवून देण्यात महापालिका प्रशासन यशस्वी झाले आहे. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या पहिल्या अडीच महिन्यात 6 लाख 28 हजार मालमत्ता धारकांपैकी 3 लाख 9 हजार 233 मालमत्ता धारकांनी आपला कर भरणा केला आहे.

---

# भाविकांसाठी वल्लभनगर आगारातून जादा बसची सुविधा

## पिंपरी आगारातून पाच अतिरिक्त बस धावणार : 26 जूनपासून बस सेवेची सुविधा उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

येत्या आषाढी वारीनिमित्त देहू-आळंदीमध्ये जाणाऱ्या भाविकांसाठी वल्लभनगर आगारातून जादा बसची सुविधा उपलब्ध केली आहे. दरवर्षीप्रमाणे पाच जादा बसची सुविधा आगाराकडून २६ जूनपासून उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे भाविकांची, प्रवाशांची होणारी गैरसोय टळणार आहे. दरवर्षी पुणे-स्वारगेटपासून विविध आगार प्रमुखांना त्याबाबत सूचना करण्यात येतात.




आषाढी वारीनिमित्त राज्यभरातून वारकरी देहू, आळंदीमध्ये दाखल होतात. पिंपरी-चिंचवडमधून देखील मोठ्या प्रमाणात नागरिक देहू, आळंदीकडे दाखल होतात. त्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या भाविकांची, प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून वल्लभनगर आगाराच्या वतीने जादा बसची सुविधा दिली आहे. आगारातून या बस दोन्ही मार्गांवर रवाना होणार आहेत. अगोदरच नोंदणी करण्याची कोणतीही अट नाही. दिवसभर या बस दोन्ही मार्गांवर धावणार आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोयदेखील टळणार आहे. तसेच कमी दरात देहू आणि आळंदीला जाण्याची सुविधा मिळणार आहे.

> भाविकांना देहू, आळंदीसाठी यंदा पाच जादा बसची सुविधा उपलब्ध केली आहे. २६ जूनपासून ही सुविधा आगाराच्या वतीने दिलेली आहे. नागरिकांनी याचा अधिकाधिक वापर करावा. आवश्यकता भासल्यास आणखी फेऱ्या वाढवण्यात येतील.
> - संजय वाळवे, आगारप्रमुख, पिंपरी-चिंचवड.

जादा बसच्या या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आगाराच्या वतीने करण्यात आले आहे. एसटी बसची संख्या दिवसेंदिवस घटू लागली आहे. त्यात सध्या धावणाऱ्या बस या वारीनिमित्त देण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होणार आहे. मात्र एसटी प्रशासनाने वारकरी व भाविकांसाठी त्या बस उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

# मिळकतकरातून पालिकेला 1,330 कोटींचे उत्पन्न

## पुणे महापालिकेला मिळकतकरामधून 17 जूनपर्यंत सुमारे 1330 कोटी 65 लाख रुपयांचे उत्पन्न



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेला मिळकतकरामधून १७ जूनपर्यंत सुमारे १३३० कोटी ६५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये सर्वाधिक भरणा हा ऑनलाईन पद्धतीने झाला असून एकूण करदात्यांपैकी ६८ टक्के म्हणजेच ४ लाख ९४ हजार ६९४ मिळकतधारकांनी कर जमा करण्याकरिता ऑनलाईन पद्धतीचा वापर केल्याची माहिती पालिकेच्या मिळकतकर विभागाच्या वतीने देण्यात आली. त्यांनी जमा केलेल्या कराचे प्रमाण आजवर जमा झालेल्या कराच्या ६१ टक्के आहे.

पालिकेकडून करवसुलीवर विशेष भर देण्यात आला आहे. त्यानुसार एप्रिल महिन्यापासून म्हणजेच आर्थिक वर्ष सुरू झाल्यापासूनच करवसुली सुरू झाली होती. पहिल्या दोन महिन्यात म्हणजे एप्रिल आणि मे महिन्यात मिळकतकर भरणाऱ्या नागरिकांना ५ ते १० टक्के सूट दिली जाते. नागरिकांकडून मुदतवाढ देण्यासाठी सातत्याने मागणी केली जात होती. त्यानुसार नागरिकांना १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदत १५ जूनपर्यंत वाढवून देण्यात आली होती. ही मुदत संपुष्टात आली आहे. दरम्यान १६ जूनपर्यंत महापालिकेला ११३० कोटी ६५ लाख एवढे उत्पन्न प्राप्त झाले होते. १७ जून रोजी एकाच दिवसात १ कोटी ९३ लाखांचे उत्पन्न मिळाले.

पालिकेच्या एकूण एकूण मिळकतधारक करदात्यांपैकी ७ लाख ३१ हजार ३४२ करदात्यांनी १७ जूनपर्यंत मिळकतकराचा भरणा केला आहे. आणखी ५ लाख मिळकतधारकांनी कर भरलेला नाही. त्यामुळे मिळकतकराचे यंदाचे उत्पन्न २८०० कोटी रुपयांपर्यंत जाण्याची अपेक्षा मिळकतकर विभागाला आहे. ऑनलाईन पद्धतीने करभरणा करण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले आहे.

# कोट्यवधींच्या घोटाळ्याचा तंत्र शिक्षण विभागाचा मंत्र!

## शासकीय तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालयांचे 'थर्ड पार्टी' ऑडिट कागदावर : नियमापेक्षा कित्येकपट अधिक मोबदला



**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील महापालिका, नगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (लोकल बॉडी ) 'विकास कामांचे ऑडिट' हे सरकारी तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालये करतात. हे ऑडिट झाल्यानंतर महापालिका, नगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा ह्या शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयांना कामाचा मोबदला म्हणून वीस टक्के मानधन देतात. मात्र, थर्डपार्टी संस्था अनेक रिपोर्ट महाविद्यालयातच बसून बनवले जात आहेत. तसेच हे रिपोर्ट ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे तयार केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे 'विकासकामे' निकृष्ट दर्जाची होत आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या इमारती, रस्ते, पूल निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे ते धोकादायक स्थितीत किंवा अल्पायुष्य ठरत असल्याचे वास्तव आहे.

महापालिका, नगरपालिका, नगर परिषदा व जिल्हा परिषदा यांचा अर्थसंकल्प कोट्यवधींचा असतो. तसेच या स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र व राज्य सरकाकडून थेट निधी मिळत असतो. दरवर्षी स्थानिक स्वराज्य या निधीमधून विविध विकासकामे करतात. ही विकासकामे चांगली, दर्जेदार व्हावीत म्हणून या कामांचे थर्डपार्टी ऑडिट केले जाते. हे ऑडिट राज्यातील सरकारी तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत केले जाते. याची जबाबदारी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी यांच्यावर असते. त्या मोबदल्यात त्यांना वार्षिक पगाराच्या वीस टक्के मानधन दिले जाते. मात्र, अनेक प्राध्यापक कार्यालयात बसूनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासकामांचे ऑडिट करतात. धक्कादायक बाब म्हणजे ठेकेदारांच्या मर्जीप्रमाणे हे ऑडिट केल्याचे आत उघड झाले आहे.

> "राज्य सरकारी तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालये महापालिका, नगरपालिका, नगर परिषदा आणि जिल्हा परिषदांच्या विकास कामांचे ऑडिट करतात. मात्र, हे ऑडिट ठेकेदारांच्या मर्जीप्रमाणे महाविद्यालयात बसून केले गेले आहे. त्यांनी वीस टक्क्यांपेक्षा अधिक मानधन घेतले आहे. माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीप्रमाणे कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाला आहे. याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या महासंचालकांकडे केली आहे.
>
> **- अभिजित खेडकर, सामाजिक कार्यकर्ते.**

सरकारी निर्णयानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या वार्षिक एकूण मूळ वेतनाच्या वीस टक्के रक्कम घेता येते. म्हणजेच प्राचार्य, शिक्षक यांना जास्तीत जास्त सहा लाख घेता येते. मात्र, सामाजिक कार्यकर्ते अभिजित खेडकर व डॉ. अभिषेक हरिदास यांनी राज्यातील माहिती मागवली असता अनेक प्राचार्य व शिक्षकांनी कोट्यवधी रुपये मानधन घेतले असल्याची माहिती 'माहिती अधिकारात' मिळाली आहे. ही रक्कम म्हणजे पगाराच्या दुप्पट, तिप्पट तर काही ठिकाणी दहापटही आहे. महाविद्यालयातील चतुर्थ कर्मचारीसुद्धा यात मालामाल झाले आहेत.

# पीएमआरडीएच्या घरांच्या सोडतीला मुहूर्त

## गृहप्रकल्पातील सदनिकांची सोडत काढण्यास अखेर मुहूर्त महिनाअखेरीस सोडत प्रकिया राबविण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

तीन वेळा सोडत प्रक्रिया राबवूनही नागरिकांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे रखडलेल्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वाल्हेकरवाडी गृहयोजना आणि पेठ क्रमांक १२ येथील गृहप्रकल्पातील शिल्लक सदनिकांची सोडत काढण्यास अखेर मुहूर्त मिळाला आहे. महिना अखेरपर्यंत सोडत काढण्याची कार्यवाही पीएमआरडीएकडून राबविली जाणार आहे.

वाल्हेकरवाडी येथील पेठ क्रमांक ३० व ३२ येथे पीएमआरडीएच्या वतीने ७९८ घरांचा प्रकल्प साकारला आहे. या गृहप्रकल्पात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) नागरिकांसाठी ३७८ वन रुम किचन सदनिका बांधून तयार आहेत. तर, अल्प उत्पन्न गटातील (एलआयजी) नागरिकांसाठी ४१४ वन बीएचके सदनिका आहेत.

घरांसाठी यापूर्वी एकदा सोडत काढण्यात आली होती. त्यावेळी ११५ जणांनी पूर्ण पैसे भरले होते. त्यापैकी ३६ कुटुंबांना निवडणूक आचारसंहितेपूर्वी ताबे देण्यात आले. दरम्यान, या गृहप्रकल्पातील बहुतांश घरे शिल्लक आहेत. त्यासाठी आता पुन्हा एकदा सोडत प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेमधील पेठ क्रमांक १२ येथील गृहप्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात ४ हजार ८८३ घरे बांधण्यात आली. या गृहप्रकल्पात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी ३ हजार ३१७ तर, अल्प उत्पन्न गटासाठी १ हजार ५६६ सदनिका आहेत. या गृहप्रकल्पांमध्ये ईडब्ल्यूएसमध्ये असणाऱ्या सर्व वन बीएचके सदनिका वितरित झालेल्या आहेत.

परंतु, अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी उभारलेल्या २ बीएचके घरांपैकी अनेक घरांचे वितरण प्रलंबीत आहे. त्यासाठी देखील नव्याने सोडत काढली जाणार आहे. महिना अखेरपर्यंत नव्याने सोडत प्रक्रिया राबवून सदनिकांचे हस्तांतरण करण्यात येणार आहे.

काम पूर्ण न झाल्याने ठेकेदाराला एक कोटी ६१ लाख रुपयांचा दंड लावण्यात आला. कोरोनानंतर बांधकाम साहित्य आणि कच्च्या मालात झालेली भाववाढ, वाढती महागाई यामुळे भाववाढ मिळण्याबाबत कंत्राटदाराने पीएमआरडीएकडे विनंती केली होती.

करोना प्रादुर्भाव आणि कामाची गती लक्षात घेऊन ५८.७० लाख रुपये दंडाची रक्कम कंत्राटदाराला परत केली गेली. तरी, त्याने प्रकल्प पूर्ण करण्यास विलंब लावल्याने आमदार अश्विनी जगताप यांनी डिसेंबर २०२३ मध्ये हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न मांडला होता. उत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने हा प्रकल्प पूर्ण करुन घेण्याचे आदेश पीएमआरडीएला दिले होते.




### चारवेळा मुदतवाढ तरीही रखडला होता प्रकल्प

» सन २०१६ मध्ये निविदा प्रक्रिया राबवून एका खासगी कंपनीला हा गृहप्रकल्प विकसित करण्यासाठी ४२ महिन्यांच्या मुदतीवर काम देण्यात आले. त्याची मुदत सन २०१९ पर्यंत असताना दरम्यान करोनामुळे हा प्रकल्प रखडला. पीएमआरडीएचे अधिकारी अथवा ठेकेदार संस्थेचे प्रतिनिधी प्रकल्पाकडे फिरकले नसल्याने या जागेवर अतिक्रमण झाले. हा प्रकल्प मार्गी लावण्यात अडचणी निर्माण झाल्या. मुदतीत प्रकल्प पूर्ण करण्यात ठेकेदाराला अपयश आल्यानंतर ठेकेदाराला तब्बल चारवेळा मुदतवाढ देण्यात आली.

> पेठ क्रमांक १२ आणि वाल्हेकरवाडी याठिकाणी बांधण्यात आलेल्या दोन गृहप्रकल्पांमधील शिल्लक सदनिकांचे हस्तांतरण करण्यासाठी नव्याने सोडत काढण्यात येणार आहे. चालू महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सोडत काढण्याचे नियोजन आहे
>
> **- अभिजीत जगताप, तहसीलदार, पीएमआरडीए**

# यंदाही पुनरावृत्ती होण्याची भीती मान्सूनचा पुन्हा तोच पॅटर्न?

## जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सूनचे आगमन, परंतु एक-दोन दिवस पाऊस पडल्यानंतर पाऊस दडी मारतो

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांमध्ये मान्सूनने एक वेगळाच पॅटर्न अवलंबला आहे. जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होते परंतु एक-दोन दिवस पाऊस पडल्यानंतर पाऊस दडी मारतो. थेट जुलै महिन्यात जोरदार पावसाला सुरुवात होते. मान्सूनच्या या बदललेल्या पॅटर्नची यंदाही पुनरावृत्ती होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शहर आणि परिसरात 8 व 9 जूनला जोरदार पाऊस पडला. त्यानंतर काही भागांमध्ये तुरळक सरी पडत आहेत. एखाद्या भागात थोड्या वेळासाठी जोराचा पाऊस पडतो परंतु त्याच वेळी शहराच्या इतर भागांमध्ये बिलकुल पाऊस नसतो.

पूर्वी पहिला पाऊस पडला की त्यानंतर काही दिवस थोड्या थोड्या अंतराने पावसाच्या सरी कोसळायच्या. परंतु गेल्या पाच ते सहा वर्षांपासून यात बदल दिसून येत आहे. जून महिन्यात खूप कमी पाऊस पडतो आणि ही कमतरता जुलैच्या अखेरच्या आठवड्यात व ऑगस्ट महिन्यात भरुन काढतो.

यामुळे बऱ्याचदा शेतकऱ्यांना दुबार पेरणी करण्याची वेळ येते. यंदा मान्सून जोरदार बरसणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. परंतु पिंपरी-चिंचवडमध्ये पहिला पाऊस हलक्या ते मध्यम सरींच्या स्वरुपात पडला. त्यानंतर दिवसांतून एक-दोन वेळा काही भागांमध्ये शिडकाव तर काही भागांमध्ये हलक्या सरी बरसल्या आहेत.

शनिवारी चिखली भागात जोरदार पाऊस पडला परंतु पिंपरी परिसरात ऊन होते. रविवारी सांगवी परिसरात जोरदार पाऊस पडला. गेल्या दहा दिवसांमध्ये पहिले एक-दोन दिवस सोडले तर संततधार पाऊस झाला नसल्याचे दिसून आले आहे.



### सरासरी पूर्ण पण कोरडे दिवस वाढले

» गेल्या काही वर्षांमध्ये मान्सूनच्या सुरुवातीला होणारा पाऊस कमी झाला आहे. परंतु मान्सूनपूर्व आणि अवेळी पाऊस वाढला आहे. तसेच सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे पाऊस पावसाळ्यातील सरासरी गाठत असला तरी कोरड्या दिवसांचे प्रमाण वाढले आहे. कोरडे दिवस वाढून थोड्या दिवसांत अधिक पाऊस पडतो. अतिवृष्टीचा शेतीला फटका बसतो आणि पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने नुकसानही होते.

### चुकताहेत पाणीपुरवठ्याचे अंदाज

» सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत चांगला पाऊस पडत राहिला आणि ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत धरणे शंभर टक्के भरलेली असल्यास वर्षभराचे पाण्याचे नियोजन सुलभ होते. परंतु जुलै-ऑगस्टमध्ये जोरदार पाऊस पडतो धरणे पूर्ण भरतात, पाणी सोडावे लागते. त्यानंतर जर पावसाने दडी मारली तर पुढील पाणीपुरवठ्याचे अंदाज चुकतात.

# मोडकळीस आलेल्या घरकुलांचा विषय एरणीवर

## निधीअभावी बांधकामे रखडल्यास दुर्घटनांना आमंत्रण, घरकुलांची कामे त्वरित करा

**पुणे | प्रतिनिधी**

मागील आठवड्यात आंबेगावच्या पूर्व भागातील पोंदेवाडी येथील सुलाबाई रणपिसे या महिलेचे घर तीनचार दिवस सलग पाऊस झाल्याने ढासळले. यात सुलाबाई यांना दुखापत झाली, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, यामुळे विविध घरकूल योजनांमध्ये निधीच्या अभावामुळे दुरुस्तीचे काम रखडलेल्या घरांचा विषय एरणीवर आला आहे.

महाराष्ट्र राज्यात दुर्बल, आर्थिक दुर्बल, मागास वर्ग, अपंग, तसेच सर्वसामान्य, अशा विविध घटकातील नागरिकांना शासनाकडून पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, तसेच विविध आवास योजनांमधून घरकुले मंजूर केली जातात. अनेक तालुक्यांत मागासवर्गीय तसेच इतर घटकांसाठी घरकूल मजूर होऊन बांधकाम केले जाते.

परंतु सर्वसामान्य (खुल्या) घटकातील गटातील आर्थिक दुर्बल गटातील नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेतून घरकूल मंजूर असले तरी निधीअभावी घराची बांधकामे रखडली आहेत. प्रशासनाने यावर सर्व्हे करून पावसाळ्याच्या दिवसांत धोकादायक घरामध्ये राहणाऱ्या नागरिकांना लवकरात लवकर घरकूल बांधून देऊन दिलासा देण्याची गरज निर्माण झाली आहे.



### उपाय केल्यास दुर्घटना टळतील

» दरवर्षी पंतप्रधान घरकूल आवास योजना, यशवंत घरकूल योजना, यशवंत अपंग घरकूल योजना, शबरी आवास योजना व रमाई आवास योजना, अशा विविध योजनेतून नवीन घरकूल मंजूर करून बांधकामे केली जातात. प्रत्येक योजनेमधून प्रत्येक घटकासाठी निधी उपलब्ध व्हावा.या आवास योजनेसाठी जसा स्वतंत्र निधी असतो, तसाच किंवा त्याच्या प्रमाणात घरकूल दुरुस्तीसाठी दरवर्षी प्रत्येक गावाला त्या त्या योजने अंतर्गत ठराविक निधी उपलब्ध करून द्यावा. हिवाळ्यानंतर धोकादायक घरांचे सर्वेक्षण करून त्यांना पावसाळ्याअगोदर निधी दिल्यास पावसाळ्यात घर पडून होणाऱ्या दुर्घटनांचे प्रमाण कमी होतील.

### उपाय योजावेत...

» आंबेगाव तालुक्यातील गावांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या नागरिकांची घरे मुसळधार पाऊस झाल्यास भिंतीमध्ये पाणी जिरून भिंती पडून मोठ्या अपघात घडण्याची शक्यता आहे.. ही शक्यता लक्षात घेता आंबेगाव तालुका प्रशासनाने आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या सर्वच घटकातील आणि ज्या नागरिकांची घरकुले मंजूर आहेत. पण ते धोकादायक घरात राहतात, अशा घरांची पाहणी करून तातडीने उपाय योजना कराव्यात. या कामी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

शासनाने दरवर्षी धोकादायक घरांचे सर्व्हे करून तातडीने निधी मंजूर करावा. एखादी घटना घडल्यानंतर पाहणी करून नुकसान भरपाई देण्याची वेळ येण्याअगोदरच कार्यवाही करावी. अशा दुर्घटनेत जीवित हानी झाल्यास नुकसान भरपाई देऊनसुद्धा नुकसान भरून निघणार नाही. याचा विचार करता प्रशासनाने दरवर्षी धोकादायक घरांच्या बांधकामासाठी किंवा दुरुस्तीसाठी आपत्कालीन परिस्थितीतील निधी उपलब्ध करून द्यावा.

सात वर्षांपासून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत पार्वताबाई महादू गुणगे यांचे घरकूल मंजूर आहे. परंतु सर्वसामान्य (खुल्या) घटकांसाठी शासनाकडे निधी मंजूर नाही, या कारणास्तव आजतागायत गुणगे यांना घरकुल मिळाले नाही. पार्वताबाई महादू गुणगे यांचे माती दगड बांधकाम असलेल्या घराची कौले तुटायला लागली आहेत. तर मातीच्या भिंतीना पावसाचे पाणी लागून भिंती कधी ही ढासळू शकतात, अशी परिस्थितीत निर्माण झाली आहे.

अवसरी बुद्रुक येथील पंतप्रधान आवास घरकुल योजनेअंतर्गत मंजूर असणाऱ्या परंतु निधीअभावी काम रखडलेल्या आणि मोडकळीस आलेल्या घरकुलांचे प्रामुख्याने कामे सुरू करावे, सरपंच सारिका हिंगे पाटील यांनी सांगितले.

# त्रेधातिरपिट शेतकरी, व्यापाऱ्यांचाही भाजीपाला भिजला

## तळेगाव ढमढेरे येथे शेतकऱ्यांसह शेतीमालांची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांची धांदल उडाली

**पुणे | प्रतिनिधी**

तळेगाव ढमढेरे येथे सोमवारच्या आठवडी बाजारात दुपारी चारनंतर जोरदार पाऊस सुरू झाल्याने व्यापाऱ्यांची दैना उडाली. उत्पादक शेतकऱ्यांसह विविध शेतीमालांची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांची एकच धांदल उडाली. यावेळी बाजारात सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. याचा फटका शेतकरी, व्यापाऱ्यांना झाला आहे.

तळेगाव ढमढेरे येथील आठवडे बाजारात अचानक पाऊस सुरु झाल्याने व्यापाऱ्यांनी व शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला माल पाण्यात गेला. बाजार मैदान नदीकाठावर असल्याने बाजारपेठ व गावातील पावसाचे पाणी उतरत्या मार्गाने बाजार मैदानातून नदीला जाते.

त्यामुळे बाजार पेठ व गावच्या वेशीमार्गे आलेल्या पाण्याचा लोट बाजारातील व्यापारी व शेतकऱ्यांच्या मालात शिरला. तरकारी माल पाण्याबरोबर वाहू लागल्याने शेतीमाल वाचवण्यासाठी भरपावसात धावपळ करावी लागली.

दौंड तालुक्यात राहू बेट परिसरात रविवार (दि.१६) झालेल्या पावसाने अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. दिवसभर पाऊस येण्याची शक्यता नसताना सायंकाळी मात्र पावसाने नागरिकांची चांगलीच दाणादाण उडविली. मोठ्या प्रमाणात चक्रीवादळ असल्यामुळे अनेक ठिकाणी झाडे कोसळली. अनेक विजेचे खांब कोसळल्याने अजून वीज पूर्ववत झालेला नाही. राहू, वाळकी, कोरेगाव भिवर, टाकळी व बेट परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. शेतात बांध फुटून नुकसान झाले आहे.



### शेतीमाल वाहून गेला

» बाजार मैदानातील ड्रेनेजलाईन पालापाचोळा अडकल्याने बाजारमैदान पाण्याने तुडुंब भरले होते. ग्रामपंचायत व व्यापारी यांच्या सतर्कतेने तातडीने ड्रेनेज मोकळे केल्याने पाण्याचा प्रवाह कमी झाला काही काळ पाऊस कमी झाल्याने व्यापारी व ग्राहक यांनी गर्दी केली होती. परंतु पुन्हा पावसाने झोडपल्याने बाजारात पाणीच पाणी झाले होते. त्यामुळे व्यापारी व शेतकरी यांचा शेतीमाल वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. ग्राहकांची बाजारात खरेदीसाठी तारांबळ उडाली होती..

अनेकांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी उसाची लागवड केली आहेत. ऊस लागवडीला धोका निर्माण झाला आहे. नवीन लागवडीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचले तर त्या उसाच्या उगवण क्षमतेवर परिणाम होऊन पूर्ण पीक वाया जाण्याची शक्यता आहे.

अनेकांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी उसाची लागवड केली आहेत. ऊस लागवडीला धोका निर्माण झाला आहे. उसाच्या उगवण क्षमतेवर परिणाम होऊन पूर्ण पीक वाया जाण्याची शक्यता आहे.